# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 13 October 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १३ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

प्रधानमंत्री गतिशक्ति योजनेनं भारताच्या विकासातील मुलभूत आराखड्याला नविन स्वरुप प्रदान करण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावल्याचं म्हटलं आहे.या योजनेला तीन वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यवारील आपल्या संदेशात हे गौरोवोद्गार व्यक्त केले.योजनेमुळं देशाचा विविध क्षेत्रातील गतीमान आणि समायोजित विकास सुनिश्चित करण्यासह प्रगती –उद्यमशिलता – नवोन्मेष यांना चालना मिळाल्याचं ते म्हणाले. नागरीकांसाठी याद्वारे नव्या संधी उपल्ब्ध होत असल्याचही पंतप्रधानांनी नमूद केलं.

****

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु या अल्जीरिया, मॉरिटानिया आणि मलावी या तीन अफ्रीकी देशांच्या दौऱ्यावर रवाना झाल्या आहेत. आजपासून १९ ऑक्टोंबरपर्यंत हा दौरा असणार आहे. भारताच्या राष्ट्रपतीनं या तीन देशांचा दौरा करण्याची ही पहिलीच वेळ आहे. राष्ट्रपती या दौऱ्यात समपदस्थांशी द्विपक्षीय संबंधावर चर्चा करणार आहेत.

****

आसाममध्ये मध्यवर्ती भागात ब्रह्मपुत्र नदीच्या उत्तर किनाऱ्यावरील उदलगुड़ी जिल्ह्यात आज सकाळी पावणे आठ वाजता, भूकंपाचे झटके बसले. चार पुर्णांक दोन शतांश रीश्टर स्केल अशी याची तिव्रता होती.

तर, जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यातही आज सकाळी सव्वासहाच्या सुमारास भूकंपाचे झटके बसले. चार पुर्णांक तीन शतांश रीश्टर स्केल अशी याची तिव्रता होती. या दोन्ही भागात भूकंपामुळे कोणतीही जिवित अथवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही.

****

माजी राज्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या काल संध्याकाळी झालेल्या हत्येची जबाबदारी कथित लॉरेंस बिश्नोई टोळीनं घेतल्याचं वृत्त समोर आलं आहे. त्यास तपास यंत्रणांनी अद्यापपर्यंत दुजोरा दिलेला नाही. या प्रकारणी, मुंबई पोलिसांकडून कसून तपास सुरु आहे. संबंधीत तिघांपैकी दोन जणांना ताब्यात घेण्यात आलं असून एक गुन्हेगार फरार आहे. घटनास्थळाचा पंचनामाही झाला आहे. सिद्दीकींच्या पार्थिव देहावर आज मुंबई इथं रात्री साडेआठ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांचा मुलगा झिशान सिद्दीकी यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सिद्दीकी यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. याप्रक्ररणी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सत्ताधाऱ्यांनी पाय उतार होण्याची तर, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

****

नांदेडमध्ये आज शासनातर्फे  महिला सक्षमीकरण आनंद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. महिला भगिनींसह नागरिकांशी संवादाचा हा कार्यक्रम आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची याला प्रमुख उपस्थिती असणार आहे.

****

नवी मुंबई महापालिका आणि परिसराला पाणीपुरवठा करणारी मोरबे धरणाची दोन हजार पन्नास मिलीमीटर व्यासाची मुख्य जलवाहिनी आज सकाळी फुटली. जलवाहिनीवरील मॅनहोल फुटल्यानं भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र इथून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राला होणारा पाणीपुरवठा दुरुस्ती कामासाठी बंद करण्यात आला आहे. सध्या मुख्य जलवाहिनी दुरुस्तीचं काम युद्धपातळीवर सुरू असून दुपारी २ वाजेपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळं नागरिकांनी पाणी जपून वापरावं असं आवाहन महापालिकेच्यावतीनं करण्यात आलं आहे.

****

आजच्या राजकीय परिस्थीतीमध्ये कोण कोणत्या पक्षात जाईल याचा नेम राहिला नाही, असं प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईत सध्या सुरु असलेल्या पक्षाच्या मेळाव्यात केलं आहे.

****

कझाकिस्तानच्या अस्तानामध्ये आयोजित अशियायी टेबल टेनिस स्पर्धेत महिला दुहेरीत

अह्यिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या भारतीय जोड़ीनं उंपांत्य फेरीत मजल मारल्यानं भारताला एक पदक मिळणं निश्चित झालं असून या स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात  भारताकडून असं  पहिल्यांदाच होणार आहे.आजच्या स्पर्धेच्या समारोप दिनी उपांत्य फेरीत या जोडीचा सामना जपानच्या जोडीशी होत आहे.

****

महिला टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात, अंतिम चार संघात स्थान मिळवण्यासाठी संध्याकाळी साडेसातला शारजाह इथं सामना होत आहे.

****